# सीएसएमटी- मुंबई सेंट्रलपर्यंत भुयारीकरणाचा २८वा टप्पा पूर्ण

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे भुयारीकरणाचा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मुंबई सेंट्रल पर्यंतचा महत्त्वाचा २८वा टप्पा पार पडला. एकाच टप्प्यात सलग ४ किमी. अंतराचे भुयारीकरण करणारे वैतरणा -२ हे मेट्रो-३ चे पहिले टीबीएम ठरले. पॅकेज २ च्या वैतरणा २ या टीबीएमद्वारे भुयारीकरणास फेब्रुवारी २०१८ मध्ये सीएसएमटी लॉंचिंग शाफ्ट येथून सुरुवात झाली होती. एकूण २७३० कॉंक्रिट रिंग्स चा वापर करत मेट्रो ३ मार्गिकेवरील मुंबई सेंट्रल पर्यंतचे सर्वात जास्त अंतराचा पल्ला वैतरणा २ टीबीएमने गाठला.